बुधवार, दि २४ सप्टेंबर २०२५ ● जालना ● वर्ष १३ वे ● अंक ४ था ● किमंत २ रु. ● पाने ४ RNI: MAHMAR/2013/50827 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/

# पोलीसांना हप्त्याचा डोस लाला म्हणतोय युवका विषय ढोस!

**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्ह्यात पोलिस प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. गुटखा माफिया सतीश उर्फ लाला याला कायद्याचे संरक्षण मिळाल्याचे आरोप होत असून, यामुळे कायद्यावरील विश्वास ढासळत असल्याचे चित्र स्पष्ट होत आहे. केवळ आरोग्यासाठी धोकादायक असलेला गुटखा हा आता सामाजिक, सांस्कृतिक आणि कायदेशीर समस्येचा केंद्रबिंदू ठरू लागला आहे.

गुटखा हा केवळ एक तंबाखूजन्य पदार्थ नाही, तर तो दररोज हजारो लोकांच्या जीवनाशी खेळणारे मृत्यूचे बीज आहे. सतत गुटखा सेवनामुळे मुखाचा कर्करोग, पचनाचे आजार, व दात-हाडांचे विकार वाढले आहेत. यामुळे अनेक कुटुंबे उद्ध्वस्त होत असून, आरोग्य सेवांवर ताण वाढतो आहे. या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने गुटखा विक्रीवर बंदी घातली असली तरी प्रत्यक्षात मात्र हा व्यवसाय जोरात सुरू आहे.

स्थानिक नागरिकांच्या मते, गुटखा माफियांचा व्यवसाय हप्त्यांच्या आधारे चालतो., ठरावीक रक्कम पोलिसांना किंवा प्रशासनातील काही अधिकाऱ्यांना दिली की, गुटखा विक्रीवर कारवाई होत नाही.

आमच्या लहान व्यवसायावर पोलिसांचा डंडा पडतो, पण गुटखा विक्रेत्यांना हात लावला जात नाही, असे लहान व्यवसायिकांचे मत आहे. गुटख्याच्या विक्रीतून माफिया लाखो रुपये कमावत असतानाही, समाजात फक्त विष पसरते आहे.

सतीश उर्फ लाला या गुटखा माफियाला प्रशासनाने मोकळीक दिली असल्याचा आरोप गंभीर मानला जातो., जर पोलिस प्रशासनानेच माफियाला संरक्षण दिले तर कायद्याचा गाभा संपतो. यामुळे प्रामाणिक नागरिकांमध्ये भीती व संताप वाढत आहे. कायद्याचे पालन न करणाऱ्यांना पाठबळ मिळाल्याने गुन्हेगारी वृत्तीला खतपाणी मिळते.

गुटखा विक्रीतून तरुण वर्ग सर्वाधिक प्रभावित होतो. शाळा-कॉलेज परिसरात गुटखा सहज उपलब्ध असल्यामुळे पुढील पिढी धोक्यात येते आहे. पालक व सामाजिक कार्यकर्त्यांमध्ये नाराजी वाढली असून, प्रशासन झोपेत आहे का? असा सवाल केला जातो. समाजात असा संदेश गेला आहे की, हप्ता दिला की कायदा झोपतो. परिणामी, सामान्य नागरिकांचा कायद्यावरील विश्वास कमी होतो आणि गुन्हेगारांची धाडस वाढते.

गुटखा व्यवसायावर बंदी असूनही त्याकडे दुर्लक्ष केले जाणे ही गंभीर बाब आहे. गुटखा माफियांची आर्थिक ताकद मोडण्यासाठी विशेष मोहिमा राबविण्याची गरज आहे. पोलिस व प्रशासनातील दोषींवर कठोर कारवाई केली नाही तर ही हप्ता संस्कृती अधिक मजबूत होईल. आरोग्य, कायदा व समाज या तिन्ही आघाड्यांवर हानी पोहोचवत असलेल्या गुटखा व्यवसायाला रोखण्यासाठी राज्य सरकारच्या हस्तक्षेपाची आवश्यकता आहे.

जालना जिल्ह्यातील परिस्थिती ही केवळ एका माफियाची गोष्ट नाही, तर कायद्याच्या अंमलबजावणीतील गंभीर त्रुटीचे दर्शन आहे. गुटखा माफियाला मोकळीक मिळत राहिली तर आरोग्य व्यवस्था, सामाजिक बांधिलकी आणि न्यायव्यवस्था या तिन्हींचा पाया ढासळण्याची भीती व्यक्त होत आहे.

## अतिवृष्टीग्रस्त भागामध्ये तात्काळ पंचनामे करुन आर्थिक मदत देण्याची आ. कुचे यांची मागणी



**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्हयातील अतिवृष्टीग्रस्त भागामध्ये तात्काळ सरसगट पंचनामे करुन आर्थिक मदत शेतकऱ्यांना देण्याची मागणी भाजपा जिल्हाध्यक्ष आ.नारायणराव कुचे यांनी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांची भेट घेऊन, जालना जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. अंबड तालुक्यातील बनटाकळी आणि मठजळगाव तांडा, तसेच बदनापूर तालुक्यातील बुट्टेगाव येथिल साठवण तलाव फुटले असुन जिल्ह्यामध्ये एकूण पाच ठिकाणचे पान ३ वर

## अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना मदत मिळून देण्यासाठी शासन दरबारी पाठपुरावा करणार - भास्कर दानवे

**जालना । प्रतिनिधी -** जालना तालुक्यात मागील तीन दिवसांपासून होत असलेल्या अतिवृष्टीमुळे अनेक गावा सह शेतात पूराचे पाणी शिरल्याने शेतीसह पिकांचे अतोनात नुकसान होऊन शेती व पिक वाहून गेले अशा अतिवृष्टीग्रस्त गावे मौजे धारकल्याण, वडगाव वखारी, नाव्हा, पत्रातांडा इत्यादी ठिकाणी भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे यांनी पाहणी केली. यावेळी शेतकऱ्यांसोबत संवाद साधून शेतकऱ्यांना धीर देऊन सांगितले की, अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मदत मिळवून देण्यासाठी शासन दरबारी आपण स्वत पाठपुरावा करणार व शेतकऱ्यांना मदत मिळवून देणार असे त्यांनी सांगितले.

यावेळी भाजपा जेष्ठ नेते शिवाजी शेजूळ, जिल्हा सरचिटणीस वसंत शिंदे, सुनील पवार, मंडळ अध्यक्ष संजय डोंगरे, भाजपा एस.सी.मोर्चा जिल्हाध्यक्ष अनिल सरकटे, कैलास उबाळे, निवृत्ती लंके, पांडुरंग क्षीरसागर, मुकेश चव्हाण, नागेश अंभोरे, सतीश जारे, किशोर कदम, विनायक राठोड, मुरलीधर जाधव उपस्थित होते.

आज त्यांनी वरील गावांचा दौरा केला असता धारकल्याण येथे सिमेंट नाला बंधारा फुटल्याने शेतकऱ्यांची शेती वाहून गेली व अनेक ठिकाणी काढणीस आलेले सोयाबीन व कपासी सह अनेक पिके पुराने वाहून गेली व काही ठिकाणी पिकांमध्ये दोन ते तीन फुट पाणी साचल्याने पिके पाण्यात डुबून गेली. यावेळी तालुक्यातील अनके शेतकरी बांधवांनी आपल्या व्यथा डोळ्याम धून आश्रू ढाळून त्यांच्यासमोर मांडल्या त्यावेळी भास्कर दानवे पान ३ वर



## जालना शहरातील बाधित नागरिकांना तात्काळ मदत करा - भास्कर अंबेकर

**जालना । प्रतिनिधी -** मागील काही दिवसांत जालना शहरात झालेल्या अतिवृष्टीमुळे जालना शहरातील नदी-नाल्यांच्या काठावरील वस्त्यात पुराचे पाणी घुसून प्रचंड नुकसान झाले. त्याम ुळे नागरिकांचे जनजीवन विस्कळीत होऊन ते हतबल झाले. यासर्व बधीत नागरिकांना प्रशासनाने तात्काळ मदत करावी अशी मागणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर यांनी केली आहे. भास्कर अंबेकर यांच्या निवासस्थानी जालना महानगर पालिकेचे आयुक्त संतोष खांडेकर यांनी भेट दिली.



यावेळी शिवसेनेचे शहरप्रमुख बाला परदेशी, घनश्याम खाकीवाले, दुर्गे श काठोटीवाले, विधानसभा संघटक दीपक रणवरे, संदीप झारखंडे, डॉ.राजेश राऊत, वसीम पठाण, संजय रत्नपारखे यांच्यासह आदींची उपस्थिती होती. आयुक्त खांडेकर यांना घरी बोलावून जिल्हाप्रमुख अंबेकर यांनी अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीचे गांभीर्य लक्षात आणून दिले. ते म्हणाले की, शहरातील अण्णाभाऊ साठे नगर, भोईपुरा, लोहार मोहल्ला, खांडसरी, लालबाग, चंदनझिरा काही भाग, लोधी मोहल्ला गांधीनगर, बसस्थानक परिसर, लक्कडकोट परिसर, भाग्यनगर, शिवशक्ती दालमिल यांसह अनेक भागात झालेल्या प्रचंड अतिवृष्टीमुळे पुराचे पाणी घरात शिरले. याप्रमाणे जालनेकरांनी यावर्षी शहराचे अत्यंत विदारक दृश्य अनुभवले. त्या पाण्याम ुळे प्रत्येक कुटुंबाचे साधारणपणे आठ ते दहा दिवसांचे किराणा समान व धान्य पावसात खराब झाले आहे. त्याच बरोबर पान ३ वर

## मंमादेवी मंदिर चौकात गुरुवारी अंजली द्विवेदी यांची भजन संध्या

**जालना । प्रतिनिधी -** नवरात्रोत्सवानिमित्त महावीर ढक्का मित्र मंडळ व श्री मंमादेवी मित्र मंडळ यांच्यावतीने प्रति वर्षाप्रमाणे यावर्षीही मंमादेवी चौकात मातेचे भव्य जागरण ही दोन दिवसीय भजन संध्या आयोजित करण्यात आली असून, त्यात आंतरराष्ट्रीय स्तरावरील भजन गायक आपल्या सुरेल स्वरांनी भक्तांना मंत्रमुग्ध करणार आहेत.

बुधवार दि. २४ सप्टेंबर रोजी रात्री ७ वाजता भजन गायक शुभम दायमा आणि मनीष दायमा यांची भजन संध्या होणार आहे. २५ सप्टेंबर रोजी रात्री ७ वाजता आंतरराष्ट्रीय भजन गायिका सौ. अंजली द्विवेदी यांची भजन संध्या होणार आहे.

भाविक भक्तांनी भजन संध्येचा लाभ घ्यावा, असे आवाहन महावीर ढक्का मित्र मंडळ व श्री मंमादेवी मित्र मंडळाच्यावतीने करण्यात आले आहे.

## संपादकीय

# 'रक्षकच बनतोय भक्षक'; एक गंभीर सामाजिक प्रश्न

जालना शहरातील दैनिक रामविचार कार्यालय फोडून जवळपास पावणेदोन लाख रुपयांवर चोरट्यांनी डल्ला मारला, त्या वेळी पोलीसांनी केवळ २५ हजार रुपये चोरीला गेले असा गुन्हा दाखल करण्यासाठी त्यांच्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केला. विशेष म्हणजे २५ हजार रुपयांचा उल्लेख करण्यासाठीची जबाबदारी पोलीसांनी एका दलाल फोटोग्राफर दिली. या दलाल फोटोग्राफर ला इतर वृत्तपत्रांच्या नावावर पोलीसांकडून चिरीमिरी ही देण्यात येते. जेव्हा समाजाचं रक्षण करण्याची जबाबदारी असलेल्या व्यक्तीच गुन्हेगारीमध्ये सामील होतात, तेव्हा सामान्य नागरिकांचा व्यवस्थेवरील विश्वास पूर्णपणे डगमगतो. ही फक्त एक चोरी किंवा आर्थिक गैरव्यवहाराची घटना नाही, तर हे समाजाच्या नैतिक आणि कायदेशीर मूल्यांवरचं एक मोठे संकट आहे. पोलिस दल हे कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी आहे. ते नागरिकांचे संरक्षण करणारे 'रक्षक' आहेत. परंतु, जेव्हा हेच रक्षक गुन्हेगारांसोबत हातमिळवणी करतात किंवा स्वतःच गुन्ह्यांमध्ये सहभागी होतात, तेव्हा समाजाची सुरक्षा धोक्यात येते. या विशिष्ट प्रकरणात, रु १.७५ लाख रुपयांची चोरी रु २५,००० इतकी कमी दाखवून, आर्थिक गैरव्यवहार आणि फसवणूक झाल्याचे स्पष्ट दिसते. यामुळे, पोलिसांच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होते. अशा घटनांमुळे, नागरिक आपली तक्रार घेऊन पोलिसांकडे जाण्याआधी दहा वेळा विचार करतील. या प्रकरणात, पोलिसांकडून कायद्याचा गैरवापर झाल्याचे दिसते. चोरीच्या रकमेत फेरफार करणे हा एक गंभीर गुन्हा आहे, जो भ्रष्टाचार आणि पदाचा गैरवापर दर्शवतो. अशा घटनांमुळे, केवळ एका व्यक्तीला शिक्षा होत नाही, तर संपूर्ण व्यवस्थेची प्रतिमा मलिन होते. जर कायदा राबवणारेच कायद्याचं उल्लंघन करू लागले, तर समाजातील गुन्हेगारी वाढेल आणि न्यायाची संकल्पनाच संपुष्टात येईल. त्यामुळे, अशा प्रवृत्तींना वेळीच आळा घालणे आवश्यक आहे. अशा घटना पुन्हा होऊ नयेत यासाठी काही महत्त्वाच्या उपाययोजना करणे गरजेचे आहे. दोषी पोलिसांवर तातडीने आणि कठोर कायदेशीर कारवाई झाली पाहिजे. त्यामुळे इतरांनाही एक संदेश मिळेल. पोलिस दलातील भ्रष्टाचार संपवण्यासाठी प्रशासकीय स्तरावर मोठी सुधारणा करण्याची गरज आहे. नियमित ऑडिट आणि तपासणी यंत्रणा अधिक मजबूत करायला हवी. पोलिसांना केवळ कायदेशीरच नाही, तर नैतिक आणि मानवी मूल्यांचे प्रशिक्षण देणेही आवश्यक आहे. नागरिकांनीही अशा घटनांबद्दल जागरूक राहणे आणि चुकीच्या गोष्टींना विरोध करणे महत्त्वाचे आहे. समाजाच्या सुरक्षिततेसाठी 'रक्षक' हे 'रक्षक'च राहिले पाहिजेत. जेव्हा ते 'भक्षक' बनतात, तेव्हा संपूर्ण समाजाची नैतिक आणि सामाजिक घडी विस्कटते. या घटनेने प्रशासनाला स्वतःचे आत्मपरीक्षण करण्याची एक संधी दिली आहे.

# अन्नपूर्णे सदापूर्णे शंकर प्राण वल्लभे,
# ज्ञान वैराग्य सिद्ध्यर्थं भिक्षां देहि च पार्वति

अन्नपूर्णा देवी संदर्भात एक आख्यायिका सांगितली जाते. अन्नाचे महत्त्व भगवान शंकराला मान्य नव्हते. शंकर म्हणाला की प्रत्येक भौतिक गोष्ट म्हणजे एक आभास आहे, अगदी मानव खातात ते अन्नसुद्धा. दोघांच्या मध्ये वाद झाला,त्यानंतर पार्वती रुसून निघून गेली. भगवान शंकराला आणि संपूर्ण जगाला आपले महत्त्व दाखवण्यासाठी पार्वती गुप्त झाली होती माझ्याशिवाय जग कसे टीकाव धरतात आहे हेच मला आता बघायचे आहे.

पार्वती म्हणजे प्रत्यक्ष अन्नपुर्णाच. आता अन्नपूर्णाच निघून गेल्यामुळे जगात सर्वत्र हाहाःकार माजला. अन्न नसल्यामुळे लोकांचे हाल सुरू झाले.
शेवटी पार्वतीलाच दया आली आणि ती अन्नपूर्णे च्या रुपात एका मंदिरात काशीला अवतीर्ण झाली. तिने अन्नदान सुरू केले. भगवान श्रीशंकरालाही मधली सगळी परिस्थिती अनुभवाला आल्यामुळे अन्नाचे महत्त्व समजले आणि ते स्वतः पार्वतीकडे भिक्षा मागायला आले. अन्नपूर्णेचे पहिले मंदिर त्यामुळेच काशीला आहे. अन्नपूर्णा रुपाच्या उत्पत्तीबद्दल आणखी एक कथा सांगितली जाते. भगवान शिव शंकर भिक्षेला गेलेला असताना एके दिवशी त्यांना भिक्षाच मिळाली नाही. अर्थात, तसे घडावे ही नारदमुनींनी केलेली योजना होती. नंतर पार्वतीने स्वादिष्ट अन्न वाढून शंकरांना तृप्त केले. त्यामुळे प्रसन्न झालेल्या शिवांनी पार्वतीला 'तू अन्नपूर्णा' असा आशिर्वाद दिला.

आपल्या देव्हाऱ्यात अन्नपूर्णेची मूर्ती असते.. हातात पळी घेवून असणारी ही देवी म्हणजे पार्वती माता होय. संपूर्ण विश्वाला अन्न पुरविण्याचे कार्य अन्नपूर्णा देवी करते. म्हणून दररोज घराघरात तिची पूजा केली जाते. आदी शंकराचार्यांचे अन्नपूर्णास्तोत्र आपण वाचत असतो. त्यात अन्नपूर्णा मातेचे सुंदर आणि अर्थपूर्ण वर्णन केलेले आहे. महाराष्ट्रात विवाहाच्या आधी वधू गौरीहार पूजन करते. त्यावेळी अन्नपूर्णा मातेच्या पितळी किंवा चांदीच्या छोट्या मूर्तीची पूजा करून वधू सौभाग्यासाठी प्रार्थना करते. लग्न झाल्यावर मुलीला सासरी पाठवताना अन्नपूर्णे ची मूर्ती देतात. त्यामागे हा हेतू असतो की मुलीने अन्नपूर्णेची पूजा करावी, प्रार्थना करावी, 'हे अन्नपूर्णे माझ्यावर प्रसन्न हो. मी जो स्वयंपाक करते, त्यास रुची येऊ दे. मी अत्यंत मन लावून, सुंदर भावनेने अन्न बनविले आहे, त्यात सात्विकता येऊ दे. ते खाऊन सर्व तृप्त होऊ देत. माझ्या मनात मातृभाव जागा होवो. आसपास कोणीही उपाशी राहणार नाही, याची मी काळजी घेवो. भुकेल्याला अन्न देण्याचा भाव माझ्या मनी जागो.' म्हणजेच काय तर तिने अन्नपूर्णेची सेवा, उपासना करून, उत्तम अन्न कुटुंबियांना खायला घालून कुटुंब सुखी करावे अशी अपेक्षा त्यामागे असते.

आदि शंकराचार्य अन्नपूर्णा स्तोत्रात म्हणतात, 'भिक्षां देही कृपावलम्बनकरि, मातान्नपूर्णेश्वरी... म्हणजे 'कृपेचा आधार देणाऱ्या हे माते अन्नपूर्णे, तू मला



अन्नपूर्णा माता.

भिक्षा घाल' अशा शब्दांनी या स्तोत्रातील प्रत्येक विचाराचा किंवा श्लोकाचा अंतिम भाग आढळतो. ही भिक्षा अन्नाची आहे तसेच ज्ञान वैराग्याच्या सिद्धीसाठीही आहे कारण सुयोग्य अन्न शरीराला मिळाल्यानंतर पुढील ध्येये उत्तम आणि बौद्धिक पद्धतीत पार पडते. जीवनात अन्नाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. समस्त प्राणीमात्र अन्नाशिवाय जगू शकत नाहीत. अन्न शरीराला शक्ती पुरवते आणि जीवनाची नवी उमेद सतत देत राहते. अन्न खाल्ले की शरीराला एक प्रकारचे समाधान मिळते. म्हणूनच अन्नदानाला अनन्यसाधारण महत्त्व दिले गेले आहे. सर्वात श्रेष्ठ दान म्हणून अन्नदानाकडे पाहिलं जातं. आपल्याला कर्णाची गोष्ट माहिती आहेका.? कर्ण हा दानशूर होता पण त्याने अन्नदान केलं नाही म्हणून मृत्यूनंतर पुन्हा त्याला भूलोकी येवून अन्नदान करावे लागले असे सांगितले जाते.

जी महिला अन्न बनविते आहे तिचे समाधानी असले पाहिजे.शांत असायला हवे. तिने ते अन्न समाधानाने बनवले असले पाहिजे. तुम्ही पाहिलं असेल अन्नपदार्थ एकच असतो पण वेगवेगळ्या लोकांनी बनवला तर त्या अन्नाची चव वेगवेगळी असते. याचे कारणच हे की अन्न बनवणाऱ्याच्या वासना आणि मनस्थिती त्या अन्नात उतरत असते. म्हणून घरच्या अन्नपूर्णेला नेहमी समाधानात ठेवले गेले पाहिजे. असं म्हणतात तुम्ही जर मनापासून अन्नपूर्णेची उपासना केली तर तुमच्या हातून तयार होणाऱ्या पाककृती उत्तमच असतील. उत्तम अन्न हे शरीराला समाधान प्राप्त करून देते. शुचिर्भूत होऊन आनंदी वृत्तीने स्वयंपाक करण्याची आवश्यकता आहे आणि ते वातावरण घरातल्या सर्व लोकांनी निर्माण करून द्यावे. त्या अन्नात प्रेम असते. म्हणूनच आईच्या हातचे अन्न आपल्याला सगळ्यात गोड वाटते. केलेला स्वयंपाक हा आपण प्रत्यक्ष परमेश्वरासाठी करतो ही भावना करून जर केला तर तो अतिशय उत्तम होतो. म्हणूनच नैवेद्याचे अन्न हे अतिशय चविष्ट असते. म्हणूनच सत्यनारायणाला केलेला प्रसाद आणि शिरा यात फरक जाणवतो.

जा मी नाही जेवत किंवा मला नको ते जेवण असे म्हणून अन्नाचे ताट कधी दूर सारू नये. म्हणूनच जुनी वडिलधारी माणसे सांगतात जेवणावर कधी राग काढू नये तो अन्नपूर्णेचा अपमान असतो. ज्या घरात अन्नाची नासाडी होते तिथे अन्नपूर्णा नाराज होते. म्हणून अन्नाची नासाडी करू नका. आज अनेक शहरांमध्ये लग्नसमारंभात लग्नकार्यालयामध्ये, पार्ट्यांमध्ये अन्नाची खूप नासाडी होते. अन्नाचे महत्त्व जाणतात त्या काही स्वयंसेवी संस्था अशा ठिकाणचे उरलेले चांगले अन्न स्वेच्छेने स्वखर्चाने ज्यांना अन्नाची आवश्यकता आहे त्यांना पोहोचते करण्याचे खूप महत्त्वाचे काम करून खरोखरच अन्नपूर्णा मातेचा आशीर्वाद घेत आहेत. खरंतर अन्नाचे महत्त्व जाणून घेता अशा प्रकारे अन्नाची नाचणी होईल अशा प्रकारची कृती कुठल्याही कार्यक्रमात व्हायला नको हे तेवढे महत्त्वाचे आहे.
उतू नका, मातू नका, अन्नाची नासाडी करू नका अन्न पायदळी तुडवू नका असे केले तर अन्नपूर्णेची कृपा सदैव आपल्यावर राहिलं.
आधी शंकराचार्याने रचलेले अन्नपूर्णा स्तोत्र सोबत दिले आहे अनेक घरांमध्ये महिला हे स्तोत्र स्वतः म्हणत किंवा लावून ऐकता ऐकता स्वयंपाक करत असतात त्या अन्नात एक प्रकारे सात्विकता येते आणि असे अन्न आपल्या घरातील सर्व कुटुंबाला मिळायला हवे आज त्या मागचा उद्देश असतो.

**अन्नपूर्णा माता स्तोत्रम् ।।**

नित्यानन्दकरी वराभयकरी सौन्दर्यरत्नाकरी
निर्धूताखिलघोरपावनकरी प्रत्यक्षमाहेश्वरी।
प्रालेयाचलवंशपावनकरी काशीपुराधीश्वरी
भिक्षां देहि कृपावलम्बनकरी मातान्नपूर्णेश्वरी।।१।।
नानारत्नविचित्रभूषणकरी हेमाम्बराडम्बरी
मुक्ताहारविलम्बमान-विलसद्वक्षोजकुम्भान्तरी।
काश्मीरागरुवासिताङ्गरुचिरे काशीपुराधीश्वर
भिक्षां देहि कृपावलम्बनकरी मातान्नपूर्णेश्वरी।।२।।
योगानन्दकरी रिपुक्षयकरी धर्मार्थनिष्ठाकरी
चन्द्रार्कानलभासमानलहरी त्रैलोक्यरक्षाकरी।
सर्वैश्वर्यसमस्तवाञ्छितकरी काशीपुराधीश्वरी
भिक्षां देहि कृपावलम्बनकरी मातान्नपूर्णेश्वरी।।३।।
कैलासाचलकन्दरालयकरी गौरी उमा शङ्करी
कौमारी निगमार्थगोचरकरी ओङ्कारबीजाक्षरी।
मोक्षद्वारकपाटपाटनकरी काशीपुराधीश्वरी
भिक्षां देहि कृपावलम्बनकरी मातान्नपूर्णेश्वरी।।४।।
दृश्यादृश्यविभूतिवाहनकरी ब्रह्माण्डभाण्डोदरी
लीलानाटकसूत्रभेदनकरी विज्ञानदीपाङ्कुरी।
श्रीविश्वेशमनःप्रसादनकरी काशीपुराधीश्वरी
भिक्षां देहि कृपावलम्बनकरी मातान्नपूर्णेश्वरी।।५।।
उर्वीसर्वजनेश्वरी भगवती मातान्नपूर्णेश्वरी
वेणीनीलसमानकुन्तलहरी नित्यान्नदानेश्वरी।
सर्वानन्दकरी सदा शुभकरी काशीपुराधीश्वरी
भिक्षां देहि कृपावलम्बनकरी मातान्नपूर्णेश्वरी।।६।।
आदिक्षान्तसमस्तवर्णनकरी शम्भोस्त्रिभावाकरी
काश्मीरात्रिजलेश्वरी त्रिलहरी नित्याङ्करा शर्वरी।
कामाकाङ्क्षकरी जनोदयकरी काशीपुराधीश्वरी
भिक्षां देहि कृपावलम्बनकरी मातान्नपूर्णेश्वरी।।७।।
देवी सर्वविचित्ररत्नरचिता दाक्षायणी सुन्दरी
वामं स्वादुपयोधरप्रियकरी सौभाग्यमाहेश्वरी।
भक्ताभीष्टकरी सदा शुभकरी काशीपुराधीश्वरी
भिक्षां देहि कृपावलम्बनकरी मातान्नपूर्णेश्वरी।।८।।
चन्द्रार्कानलकोटिकोटिसदृशा चन्द्रांशुबिम्बाधरी
चन्द्रार्काग्निसमानकुन्तलधरी चन्द्रार्कवर्णेश्वरी।
मालापुस्तकपाशसाङ्कुशधरी काशीपुराधीश्वरी
भिक्षां देहि कृपावलम्बनकरी मातान्नपूर्णेश्वरी।।९।।
क्षेत्रत्राणकरी महाऽभयकरी माता कृपासागरी
साक्षान्मोक्षकरी सदा शिवकरी विश्वेश्वर श्रीधरी।
दक्षाक्रन्दकरी निरामयकरी काशीपुराधीश्वरी
भिक्षां देहि कृपावलम्बनकरी मातान्नपूर्णेश्वरी।।१०।।
अन्नपूर्णे सदापूर्णे शङ्करप्राणवल्लभे।
ज्ञानवैराग्यसिद्ध्यर्थं भिक्षां देहि च पार्वति।।११।।
माता च पार्वती देवी पिता देवो महेश्वरः।
बान्धवाः शिवभक्ताश्च स्वदेशो भुवनत्रयम्।।१२।।
।। इति श्रीमच्छङ्कराचार्यविरचितं
श्री अन्नपूर्णास्तोत्रं सम्पूर्णम् ।।

**दिलीप देशपांडे.**
**जामनेर. जिल्हा जळगाव .**
**मोबाईल.८९९९५६६९१७**

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी मंदार ऑफसेट कचेरी रोड, जूना जालना जालना. ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून साप्ताहिक युवा आदर्श कार्यालय, १-२९-७४४, गांधीनगर, रोहनवाडी रोड, जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले आहे. संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके, ८३९००९८८८६, ८३९००४८८८६, कायदेशीर सल्लागार : ॲड. राहुल अरुणराव चव्हाण. या अंकात प्रसिद्ध झालेले मजकूर, लेख व त्यामधून व्यक्त होणारे मत याच्याशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही (सर्व वाद जालना न्यायालयातंर्गत) आरएनआय : MAHMAR/2013/50827

Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Mandar Offset, Kacheri Road, Old Jalna. Jalna. 431203 (Maharashtra) Place of Publication Office Weekly Yuva Aadarsh ,1-29-744, Gandhinagar, Rohanwadi Road, Jalna. 431203 (Maharashtra). Editor : Deepak Shrikrushna Shelke, Mob. 8390098886, 8390048886 RNI.: MAHMAR/2013/50827 Email. : yuva.aadarsh@gmail.com Website : https://yuvaadarsh.com

# रोहणवाडी येथे अतिवृष्टीमुळे पिकांचे मोठे नुकसान; नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तात्काळ मदत द्या - ज्ञानेश्वर उगले

**जालना । प्रतिनिधी -** मागील काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे जालना तालुक्यातील रोहणवाडी परिसरातील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. शेतात तसेच घरात पाणी साचल्याने शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावून गेला आहे.

या पार्श्वभूमीवर शासनाने सरसकट पंचनामे करून शेतकऱ्यांना तात्काळ मदत जाहीर करावी, अशी ठाम मागणी ज्ञानेश्वर (माऊली) उगले यांनी केली आहे.

या अतिवृष्टीची पाहणी महसूल विभागाकडून करण्यात आली. यावेळी महसूल अधिकारी नारायण डाके, ग्रामपंचायत अधिकारी कोथळकर, सहाय्यक कृषी अधिकारी श्रीमती खांडेभराड यांनी हजेरी लावून पिकांचे पंचनामे केले.

याप्रसंगी नुकसानग्रस्त शेतकरी आप्पासाहेब साळसे, दत्ता तनपुरे, बाबासाहेब चाळसे, जपालसिंग बुंदले, किसन उगले, सतीश बुंदले, अजिंक्य उगले, अंकुश बागराज, अण्णासाहेब तनपुरे, गुड्डू शेठ, विठ्ठल काळे यांच्यासह गावातील अनेक शेतकरी उपस्थित होते. शेतकऱ्यांची दैना लक्षात घेता तात्काळ मदतीची गरज असल्याचे प्रतिपादन करून शासनाने तत्पर निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.




# स्वदेशीचा नारा; पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा मास्टर स्ट्रोक...

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज घटस्थापनेच्या मुहूर्तावर भारतीय लोकांना स्वदेशीचा नारा दिला. जीएसटी २.0ची घोषणा करताना हा स्वदेशीचा नारा दिला. याला फार मोठा अर्थ आहे. स्वदेशीचा नारा हा नुसता नारा नाही तर भारताला २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र म्हणून उभे करण्याच्या मोदींच्या योजनेची ही सुरुवात आहे. स्वदेशी चळवळ सुरू झाली ती बंगाल फाळणीचा निर्णय रद्द करण्याच्या मागणीवरून, तिचा उद्देश ब्रिटिश वस्तूंवर बहिष्कार टाकून स्वदेशी उद्योगांना प्रोत्साहन देणे हा होता. पण आज त्याचे महत्त्व यानिमित्ताने पटत आहे. कारण अमेरिकन अध्यक्ष ट्रम्प यांनी भारतासह ब्राझील आणि कैक देशांवर टॅरिफ लावण्याचा आत्मघातकी निर्णय घेतला आहे. पण राष्ट्रवादाची भावना वाढवण्यासाठी त्यावेळी म्हणजे स्वातंत्र्य मिळवण्याआधी स्वदेशी चळवळीचा उपयोग झाला असला तरीही नंतर मात्र आर्थिक उदारीकरणामुळे भारताचे वाढते महत्त्व आणि भारताचे महत्त्व कमी करण्यासाठी ट्रम्प यांनी हा निर्णय घेतल्याचे बोलले जाते. त्याला शह म्हणून मोदी यांनी स्वदेशीचा नारा दिला. स्वदेशी चळवळीच्या महत्त्वातच आत्मनिर्भर भारत निर्माण करण्याचे मोदी यांचे आणखी एक उद्दिष्ट साध्य करण्याची आकांक्षा दडली आहे आणि त्यामुळे अशा उपक्रमांना प्रेरणा मिळते. खरे तर स्वदेशीचे महत्त्व तेव्हाही होते. गांधी यांनी स्वदेशी चळवळ सुरू केली आणि तेव्हा स्वदेशीचे महत्त्व लोकांना पटू लागले. पण नंतरच्या काँग्रेस नेत्यांनी या स्वदेशी चळवळीला तिलांजली दिली आणि जरी खादी ग्रामोद्योगसारखे उपक्रम सुरू केले असले तरीही काँग्रेसचे नेते आलिशान पोषाखात आणि परदेशी वस्तूंचा वापर करत राहिले. त्यांचा प्रभाव आपण पाहात राहिलो आणि त्यांनाच मते देत राहिलो. पण मोदी यांनी आता काँग्रेसला चांगलेच उत्तर दिले आहे आणि काँग्रेस देशातून भुईसपाट झाली. पण काँग्रेसचे जे चांगले विचार होते ते मोदी यांनी स्वीकारले. स्वदेशी चळवळ ही ब्रिटिश धोरणांना विरोध म्हणून सुरू झाली, तर आताची स्वदेशी चळवळ ही ट्रम्प यांच्या धोरणांना उत्तर म्हणून सुरू करण्यात येत आहे. पण मोदी यांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे ते केवळ स्वदेशी चळवळ इतक्यावरच थांबले नाहीत, तर भारताला आत्मनिर्भर बनवण्याच्या मूलमंत्राला त्यांनी स्थान दिले आणि 'वन नेशन वन टॅक्स' हा मूलमंत्र लागू केला. त्यामुळे आता जीएसटी म्हणजे वस्तू आणि सेवा कराचे दोन टप्पे लागू असतील. त्यानुसार केवळ पाच टक्के आणि १८ टक्के असे दोनच कर स्लॅब असतील. यामुळे कर प्रणालीत सुसूत्रता येईल आणि लोकांनाही नवीन कर प्रणाली सहज समजेल. वन नेशन वन टॅक्स यामुळे देश डझनभर करांच्या जाळ्यातून मुक्त झाला. मोदी सरकारचे ब्रीद 'नागरिक देवो भवः' असे आहे आणि त्यातूनच मोदी सरकार नवनव्या सुधारणा पुढे आणत आहे, असे म्हणता येईल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जीएसटी करातील सुधारणा या देशाच्या अर्थसंकल्पाला नवे गतिमान देणाऱ्या ठरतील यात काही शंका नाही. अंदाजे अडीच लाख कोटी रुपयांची वार्षिक बचत या बदलांमुळे थेट ग्राहकांच्या खिशात पडणार असून हा पैसा पुन्हा बाजारपेठेत वळेल असा अंदाज आहे. मागणीला त्याम ुळे प्रोत्साहन मिळेल आणि अर्थव्यवस्थेचे गाडे चालू राहील अशी दूसरी सकारात्म क बाजू आहे. आता जीएसटीतील बदलांमुळे रोजच्या वापरातील औषधे, घरगुती वापराच्या वस्तू, विमा सेवा यावरील जीएसटी कमी होईल आणि लोकांची क्रयशक्ती वाढेल. महागाईवर अंकुश बसेल. असे चांगले सकारात्मक परिणाम मोदी यांच्या जीएसटी २.0 योजनेमुळे भारतीय ग्राहकांना चांगले दिवस येतील. मध्यमवर्गीय कुटुंबाचा बजेटवर ताण पडतो तो महागाईमुळे. तो कमी झाल्यामुळे आपोआपच ग्राहकांची क्रयशक्ती वाढेल आणि ते अन्यत्र खर्च करू शकतील. म्हणजे दुसरा साधा अर्थ काय तर मागणी वाढल्यामुळे अर्थचक्राचे गाडे सुरू राहील. मोदी यांची स्वदेशीचा नारा हा अशा वेळेला आला आहे, की ज्यावेळी ट्रम्प यांच्यासारख्या भारतविरोधी नेत्यांनी भारतावर अवाच्या सव्वा टॅरिफ लागू केला आहे. त्याला मोदी यांनी दिलेले हे उत्तर आहे. कारण जनतेच्या हातात पैसा आला, की बाजारात तेजी येते आणि अर्थव्यवस्थेला गती येते. तेच आताही दिसणार आहे. यामुळे लहान-मोठ्या व्यवसायांना गती येईल आणि बाजारात चैतन्य येईल. यालाच गुणक परिणाम म्हणतात. सर्व स्तरांतून या निर्णयाचे स्वागत होत आहे यावरून हा निर्णय देशासाठी चांगला आहे हे म ान्य करावे लागेल. कारण जीएसटी आता फक्त ५ टक्के आणि १८ टक्के राहील. याचा परिणाम व्यापारी वर्गावर जास्त होणार आहे, कारण त्यांच्यावर या निर्णयाचा सर्वात चांगला परिणाम होणार आहे.

अर्थात हे सर्व असले तरीही राजकारणापासून जीएसटी सुधारणाही सुटल्या नाहीत. काँग्रेसला भाजपचे काहीच चांगले दिसत नाही, त्यामुळे त्यांनी यावर टीका करणे क्रमप्राप्तच होते. पण ममता बॅनर्जी आणि बिहारमधील विरोधी नेते यावर टीका करत आहेत. कारण हा चांगला निर्णय मोदी यांचा आहे. ही श्रेयवादाची लढाई आहे. ममता यांनी आपल्या सरकारला याचे श्रेय जाते असे म्हटले आहे. पण त्यांनी असे म्हणणे हे श्रेयवादाच्या लढाईत त्यांचा पराभव दिसत असल्यामुळे आहे हे खरेच आहे. जीएसटी ही संकल्पना प्रथम स्वर्गीय अरुण जेटली यांनी मांडली आणि तेव्हा पंतप्रधान नरेंद्र मोदीच होते. त्यामुळे यांचे श्रेय घेण्याचे प्रयत्न निव्वळ श्रेय लाटण्याचे आहे. पण आता जीएसटी सर्वमान्य झाली आहे आणि आता तर जीएसटी २.0 ही आली आहे. मोदी यांचा हा निर्णय देशाच्या भल्यासाठी आहे आणि जनतेच्या अंतिम कल्याणासाठी आहे. कारण कोणताही निर्णय शेवटी जनतेच्या कल्याणासाठीच करायचा असतो. मोदी हे सर्व चांगले जाणतात आणि त्यामुळे त्यांनी हा निर्णय अमलात आणला आहे. फ्रान्सने सुरू केलेला ही संकल्पना आज सर्व जगाची ओळख बनली आहे आणि स्वदेशीच्या नाऱ्याची याला जोड देऊन मोदी यांनी मास्टर स्ट्रोक मारला, हे मान्य करायलाच हवे. कारण आर्थिक स्वातंत्र्याची गुरुकिल्ली आहे, मोदी यानी ते ओळखले आहे.

**श्री.शिवाजी विठ्ठल चौगुले.**
**कागल-कोल्हापूर.**

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
MEDICAL
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले — Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख — Mob. 7770084597

## पान १ वरुन

### अतिवृष्टीग्रस्त भागामध्ये ...

साठवण तलाव फुटल्यामुळे अनेक ठिकाणी पिकांचे तसेच फळबागांचे अतोनात नुकसान होऊन शेतकरी हवालदिल झाले आहेत. काही भागांत घरे, जनावरांची शेतशेडे व इतर मालमत्तेचे देखील खूप मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

या पार्श्वभूमीवर, अतिवृष्टीग्रस्त भागातील तात्काळ सरसकट पंचनामे करून शेतकऱ्यांना योग्य ते आर्थिक साहाय्य व मदत मि ळावी, तसेच, पंचनामे वेळेत पूर्ण करण्यासाठी संबंधित प्रशासनास आवश्यक त्या सूचना देण्यात याव्यात. करिता आपल्या सहानुभूतीपूर्ण व सकारात्मक निर्णयामुळे जालना जिल्ह्यातील शेतकऱ्यांना दिलासा मिळेल असे निवेदन देण्यात आले.

### अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना ...

यांनी शेतकऱ्यांना धीर देऊन वरील आश्वासने दिले.

यावेळी परिसरातील विष्णू ढोबळे, काकासाहेब उगले, राजू उगले, विष्णू दराडे, प्रभाकर खोतकर, विष्णू घोडके, मिसाळ मामा दिनकर दराडे, विनायक उगले, सुभाष भुतेकर, वैभव उगले, कृष्णा यादव, भरत उगले, फकीरबा उगले, विनायक ताठे, सतीश उगले, इत्यादीसह भागातील शेतकऱ्यांची उपस्थिती होती.

### जालना शहरातील ...

कपडे व शाळकरी मुलांचे वह्या पुस्तके पावसाने खराब झाली आहेत. करिता अतिवृष्टीग्रस्त नागरिकांना
तातडीने आठ ते दहा दिवसांचे अन्नधान्य देणे आवश्यक होते परंतु ते अद्यापही प्रशासनाकडून मिळाले नाही. त्यामुळे अशा सर्व कुटुंबीयांचे मागील आठ दिवस उपासमारीचे गेले आहेत. घरात पाणी घुसल्याने सर्वत्र घाण साचली असून अस्वच्छता निर्माण झाली आहे.पाणी पुरवठ्याच्या पाईपलाईन मध्येही पाणी गेल्याने मोठी रोगराई पसरण्याची शक्यता आहे. त्यामुळे अगोदरच अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीनंतर रोगराई पसरली तर दवाखान्याचाही मोठा खर्चही वाढण्याची शक्यता आहे.
त्यामुळे लोक अडचणीत आले आल्याचे ते म्हणाले. तसेच शहरातील अनेक व्यापारी प्रतीष्ठान्नांमध्येही पाणी शिरले अनेक व्यापार्यांनी विमा काढला नसल्यामुळे कोटयावधीचे नुकसान झाले आहे.जालना शहरात प्रचंड अतिवृष्टीने निर्माण झालेल्या परिस्थितीस शहरातील नाल्यांवर मोठ्या प्रमाणावर झालेले अतिक्रमण तसेच महानगर पालिकेने बांधलेले नाले सदोष व अरुंद आहेत. काही ठिकाणी बांधकाम व्यवसायीकांनी नैसर्गिक प्रवाह बदलनेही या विदारक परिस्थितीस कारणीभूत ठरल्याचे सांगून खालील प्रमाणे मागण्या करण्यात आल्या. आठ ते दहा दिवसांचे अन्नधान्य तातडीने उपलब्ध करून द्या, अतिवृष्टीग्रस्त भागात मोठ्या प्रमाणावर स्वच्छता मोहीम राबवून वेळोवेळी जंतुनाशकांची फवारणी करा, मोठ्या प्रमाणावर आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन करा, ज्या भागात पाणी घुसले त्यांची वस्तीनिहाय कारणे शोधून भविष्यात अशी परिस्थिती निर्माण होणार नाही याची काळजी घ्यावी. अतिवृष्टीने चाळणी झालेल्या रस्त्यांची तात्काळ दुरुस्ती करा. ज्या नागरिकांच्या घरांची पडझड झाली, घरे, जनावरे, कोंबड्या, शेळ्या वाहून गेल्या त्यांना आर्थिक मदत द्या, व्यापार्यांच्या नुकसानीचे प्रस्ताव तयार करून शासनास सादर करा अशा मागण्याही यावेळी जिल्हाप्रमुख भास्करराव आंबेकर यांनी महापालिका आयुक्तांकडे केल्या. तसेच पुढील काळात पुन्हा पावसाचा अंदाज वर्तविला असल्याने मनपा व जिल्हा प्रशासनाने योग्य त्या खबरदारीच्या उपाय योजना करण्याची मागणी केली.

युवा आदर्श | जालना | बुधवार, दि २४ सप्टेंबर २०२५ | E-mail- yuva.aadarsh@gmail.com




# नागरिकांना घरपोच सरकारी सेवा उपलब्ध करून देणारा 'जालना मित्र पोर्टल' जिल्ह्याचा डिजिटल उपक्रम

**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्रात डिजिटल युगाची नवी सुरुवात जालना जिल्ह्यात झाली आहे. जिल्हा प्रशासनाने सुरु केलेल्या जालना मित्र पोर्टल मुळे नागरिकांना तब्बल १९ शासकीय सेवा घरबसल्या मिळणार आहेत. केवळ १०० रुपये अतिरिक्त शुल्क भरून आता आधार कार्डपासून वृद्धत्व पेन्शनपर्यंतची कामे नागरिकांच्या घरीच पूर्ण केली जाणार आहेत. या उपक्रमामध्ये राज्यात जालना जिल्हा हा पहिला 'डिजिटल जिल्हा' होण्याकडे वाटचाल करीत आहे.

**जालना मित्र पोर्टल म्हणजे काय ?**

शासकीय कामासाठी विविध कार्यालयात सामान्य नागरिकांना तासन्तास रांगेत उभे रहावे लागते. शासकीय कार्यालयात अनेक फेऱ्या माराव्यात वेळ आणि पैशाचा मोठ्या प्रमाणावर अपव्यय होतो. महाराष्ट्र लोकसेवा हक्क कायदा अंतर्गत नागरिकांना देण्यात येणाऱ्या विविध सेवा नागरीकांना घरपोच मिळाव्यात यासाठी जालना जिल्ह्याने 'जालना मित्र पोर्टल' हा नावीन्य पूर्ण उपक्रम जिल्हाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल यांच्या संकल्पनेतून तयार करण्यात आला आहे. 'जालना सेवा पोर्टलवर' यासाठी जिल्हातील कुठल्याही नागरिकांने आपल्या कामासंबंधी या पोर्टलवर जावून अपॉइंटमेंट बुक करायची आणि प्रतिनिधी थेट त्यांच्या घरी येऊन ती सेवा उपलब्ध करून देणार आहे. 'जालना मित्र' या पोर्टलमध्ये नागरिक स्वतः नजीकच्या आपले सरकार सेवा केंद्राची अपॉइंटमेंट घेवू शकतात. त्याप्रमाणे आपले सरकार सेवा केंद्रचालक संबंधित नागरिकाच्या घरी जावून सर्व कागदपत्रे घेवून आपले अर्ज भरून घेतील. यासाठी नागरिकांनी आपल्या मोबाईल क्रमांकाद्वारे लॉगिन करायचे आहे. आपल्याला ज्या विभागाशी निगडित काम आहे, तो विभाग निवडून, त्या विभागातील सेवा निवडायची आहे. नंतर आपणास त्या सेवेसाठी आवश्यक फिस, कागदपत्रे, भेट व दिनांक उपलब्ध करुन देण्यात येईल. तसेच, या पोर्टलवरून अपॉइंटमेंट घेतांना त्या सेवेसाठी लागणारे शासकीय शुल्क आणि घरपोच सेवेसाठी आकारण्यात येणारे १०० रूपये शुल्क हे पोर्टलवर दिसणार आहे. त्यामुळे नागरिकांनी तेवढेच पैसे द्यावेत.




**पोर्टलवरील १३ विभाग**

अन्न व नागरी पुरवठा विभाग, पासपोर्ट-परराष्ट्र व्यवहार मंत्रालय, अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरण, पोलीस/गृह विभाग, शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय, आयकर विभाग, ग्रामीण विकास विभाग,भूमी अभिलेख विभाग, समाज कल्याण व सामाजिक न्याय विभाग, आरोग्य विभाग,डिजिटल जीवन प्रमाण,महसूल विभाग,सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्यम मंत्रालय या विभागाचा समावेश आहे.

**कोणत्या सेवा उपलब्ध ?**

जीवनावश्यक सेवा, राशन कार्ड, आधार कार्ड, पासपोर्ट पोलीस व्हेरिफिकेशन, व्यवसायिक सेवा, चढ्वए नोंदणी, ऋढ्ख परवाना, सामाजिक सेवा, वृद्धत्व पेन्शन, निवास दाखला, डिजिटल सेवा, जीवन प्रमाणपत्र, भूमी अभिलेख (७/१२, फेरफार इत्यादी.)

**नागरिकांना काय फायदा होणार ?**

जालना मित्र या एका पोर्टलवर १३ विभागाच्या १९ सेवा नागरिकांना घरपोच उपलब्ध होणार आहे. या पोर्टलमुळे नागरिकांना विहीत कालावधीत सेवा उपलब्ध होणार असून, नागरिकांची वेळेची बचत होणार आहे. तसेच दिवसभराची कामे देखील आता काही तासातच पूर्ण होण्यास मदत होणार आहेत. यामुळे नागरिकांच्या प्रवासाचा खर्च शून्य होणार असुन पैशांची बचत होणार आहे. तसेच पारदर्शक शुल्क राहणार असुन कोणतेही लपविलेले शुल्क घेण्यात येणार नाही. तसेच नागरिकांना २४द७ ऑनलाइन बुकिंग सुविधा उपलब्ध असणार आहे.

**प्रशासनाची भूमिका**

जिल्हाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल या जालना मित्र पोर्टल बाबत म्हणाल्या की, हा उपक्रम नागरिक सेवेत नवा मानदंड ठरेल. नागरिकांना आता कार्यालयात यायची गरज पडणार नाही. तर प्रशासनच आता नागरिकांच्या दारापर्यंत पोहोचणार आहे. पारदर्शकता, वेळेची बचत आणि विश्वासार्हता हे या उपक्रमाचे मुख्य स्तंभ आहेत.

जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजाताई मुंडे म्हणाल्या की, जालना जिल्हा डिजिटल इंडियाच्या दिशेने अग्रगण्य ठरत आहे. हा उपक्रम इतर जिल्ह्यांसाठी आदर्श ठरेल.

**नागरिकांची मते**

जालना तालुक्यातील वझर सरकटे येथील विद्यार्थी म्हणतो की, मी इयत्ता दहावीत शिकत असून, मला रहिवासी प्रमाणपत्र काढायचे होते. मी जालना मित्र पोर्टलवर जाऊन बुकींग केली. लगेचच माझ्या जवळील आपले सरकार सेवा केंद्रावरील मित्राने माझे कागदपत्रे घरी येऊन घेतली. तसेच मला घरी प्रमाणपत्र आणून दिले. जालना जिल्हाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येत असलेल्या या उपक्रमामुळे आम्हा विद्यार्थ्यांना प्रशासनाप्रती आदर वाढला असुन यामुळे आमचा अभ्यासाचा देखील वेळ सुद्धा वाया गेला नाही.

नागरिकांनी 'जालना मित्र पोर्टल' वापरण्यासाठीची सोपी पद्धत (३ स्टेप्स असुन) https://jalnamitra.in या पोर्टलवर मोबाइल नंबरने लॉगिन करावे. सेवा व विभाग निवडा, अपॉइंटमेंट बुक करा. शुल्क रु १०० घरपोच सेवा फी भरावी आणि सेवा घरपोच प्राप्त करुन घ्यावी.

**संपर्क कुठे करायचा ?**

या सेवेसाठी नागरिकांनी https://jalnamitra.in या संकेतस्थळास भेट द्यावी. जिल्हाधिकारी कार्यालय, जालना यांच्याकडे आतापर्यंत या पोर्टलमार्फत २० सेवांसाठी ६१ नागरिकांनी नोंदणी केली आहे. यापैकी २८ नागरिकांच्या अर्जाबाबतचे कागदपत्रे हस्तगत करण्यात आले असून, पुढील कार्यवाही सुरू आहे. त्यापैकी ०८ लोकांच्या घरी जाऊन सदरील सेवा जालना मित्र पोर्टलने उपलब्ध करुन दिली आहे.

जिल्ह्यातील नागरिकांसाठी 'जालना मित्र पोर्टल' हि ऑनलाईन सेवा नक्कीच फायदेशिर आणि उपयुक्त ठरणार आहे.

# राज्यस्तरीय स्पर्धेत जैन विद्यालयाने पटकावला राज्यातून दुसरा क्रमांक



**जालना । प्रतिनिधी -** अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद यांच्याशी संलग्न संस्था बाल रंगभूमी परिषद आयोजित राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये- मुंबई येथे घेण्यात आलेल्या इतिहास महाराष्ट्राचा या स्पर्धेत विद्यालयाने राज्यस्तरावर दुसरा क्रमांक पटकावला आहे त्यामधील गुणवंत विद्यार्थी शाहीर सोहम वाटसर, ऑर्गन वादक - सादिक कुरेशी, ढोलकी वादक - आदर्श जगधने, संबळ वादक - करण उगले, कोरस गायक- प्रणव काटे, कोरस गायक - प्रथम वाटसर, संबळ वादक- कुणाल पवार, तुंतुने वादक- ओम उदावंत, टाळ वादक- विवेक खंडागळे यांनी उत्कृष्ट असे सादरीकरण केले.स्पर्धा झाल्यानंतर परीक्षक म्हणून महाराष्ट्रातील शाहीर श्री नंदेशजी उमप, शिवशाहीर प्रवीण जाधव, राजा शिवछत्रपती या मालिकेतील शाहिस्तेखानाची भूमिका करणारे मराठी अभिनेते श्री सुनील गोडसे तसेच बालरंग भूमी नाट्य परिषदेच्या अध्यक्षा सिने अभिनेत्री ॲड. श्रीमती नीलम शिर्के- सामंत या मान्यवरांच्या हस्ते यशस्वी कलाकारांचा स्मृतीचिन्ह, बक्षीसांचा चेक देऊन सत्कार करण्यात आला या विद्यार्थ्यांना गजानन पत्ते, वैभव वानगोता व संदिप चव्हाण यांचे मार्गदर्शन लाभले व विद्यालयातर्फे या सर्व यशस्वी कलाकारांचा शाळेच्या वतीने स्वागत व सत्कार करण्यात आला.

या सर्व विद्यार्थ्यांचे वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघाचे अध्यक्ष सुदेशकुमार सकलेचा, उपाध्यक्ष भरतकुमार गादिया, महामंत्री डॉ. धरमचंद गादिया, कोषाध्यक्ष संजय लूणावत, सहसचिव कचरूलाल कुंकूलोळ, विश्वस्त डॉ. गौतम चंद्र रुणवाल, विश्वस्त संजय कुमार मुथा, विश्वस्त नेमीचंद रुणवाल, विश्वस्त संजय बंब स्वि.वि. प्रकाशचंद सुराणा, स्वि.वि. शांतीलाल संचेती तसेच शालेय समितीचे अध्यक्ष जितेशकुमार भायानी, उपाध्यक्ष विजयकुमार भंडारी, सचिव कांतीलाल कुंकलोळ, कोषाध्यक्ष, विजयकुमार नहार एवं सर्व शालेय समितीचे पदाधिकारी तसेच शाळेचे मुख्याध्यापक शांतीलाल एम. वानगोता, उपमुख्याध्यापक डॉ. श्रीमती श्रीपत, पर्यवेक्षक श्रीमती सोमानी, श्री शिंदे, विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले.

# जालना येथे ३० सप्टेंबर रोजी पंडीत दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा भरती मेळाव्याचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** जिल्हा कौशल्य विकास,रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र,जालना अणि मातोश्री स्किल डेव्हलमेंट सेंटर,जालना यांचे संयुक्त विद्यमानाने दिनांक ३० सप्टेंबर २०२५ मंगळवार रोजी मातोश्री स्किल डेव्हलमेंट सेंटर, अंबड रोड,जालना येथे सकाळी १० ते दुपारी ४ वाजेपर्यंत पंडीत दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे. यासाठी अंदाजे २५२ पेक्षा अधिक रिक्तपदे उपलब्ध होणार आहेत. नमो महारोजगार मेळाव्यानिमित्त या मेळाव्याचे आयोजन करण्यात आलेले असून या मेळाव्यामध्ये निवड झालेल्या निवडक उमेदवारांना नमो महारोजगार मेळाव्यामध्ये दिनांक ८ ऑक्टोबर २०२५ रोजी बी.के.सी. बांद्रा मुंबई येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे हस्ते नियुक्ती आदेश देण्यात येणार आहे. रोजगार कार्यालयाकडील नोंदणीकृत सुशिक्षित महिला व पुरुष उमेदवारांना रोजगार उपलब्ध होण्यासाठी सहाय्य होण्याच्या दृष्टीने या रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.या मेळाव्यात रोजगार देणाऱ्या विविध नामांकित कंपन्या व नियोक्ते उपस्थित राहुन व प्रत्यक्ष मुलाखती घेवून उमेदवारांची निवड करणार आहे. सदर मेळाव्यामध्ये नियोक्त्यांकडून २५२ रिक्तपदे एसएससी, एचएससी, कोणतेही पदवीधर, आयटीआय ट्रेडधारक (फिटर,वेल्डर, इलेक्ट्रीशियन, मशिनिष्ट, अप्रेन्टीस ट्रेनी, अकाउंटंट असिस्टंट, डाटा एन्ट्री ऑपरेटर, सर्व्हिस ॲडव्हायझर इत्यादी) १८ ते ४५ वयोगटातील पात्रताधारक उमेदवारांसाठी पदे उपलब्ध झालेली आहेत. आणखी काही पदे उपलब्ध होणार आहेत.तसेच या मेळाव्यात स्वयंरोजगाराबाबत अर्थसहाय्य करणाऱ्या विविध शासकीय महामंडळाचे स्टॉल लावण्यात येणार असुन विविध योजनांचे मार्गदर्शन करण्यात येणार आहे. याच बरोबर स्टॉलच्या माध्यमातून शासनाच्या विविध योजना अंतर्गत विनामुल्य असलेले विविध रोजगारक्षम कौशल्य प्रशिक्षणाची माहिती देऊन नोंदणी करण्यात येणार आहे.या सुवर्ण संधीचा जास्तीत जास्त नोकरी इच्छूक महिला व पुरुष उमेदवारांनी लाभ घ्यावा. तसेच उमेदवारांनी याचा लाभ घेण्यासाठी किमान पाच प्रतीत बायोडाटा व फोटो आणि आधारकार्ड,सेवायोजन नोंदणी कार्ड इ. कंपनींना देण्यासाठी सोबत ठेवावे.नोकरी इच्छुक उमेदवारांनी अद्याप पर्यंत सेवायोजन नोंदणी केली नसल्यास www.rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी करावी किंवा यापुर्वी महास्वयंम वेबपोर्टलवर नोंदणी केली असल्यास वरील रिक्तपदे व पात्रते प्रमाणे मॅचिंग होणाऱ्या पदांसाठी ऑनलाईन प्लाय करुन लॉगीन करावे आणि प्रत्यक्ष मुलाखतीसाठी रोजगार मेळाव्याच्या ठिकाणी सकाळी ९ वाजता उपस्थित रहावे. अधिक माहितीसाठी https://rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर भेट देऊन आगामी पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा या सदराखाली जालना जिल्हा निवडून पंडीत दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्यामधील तपशिल पाहावा. याबाबत काही अडचण आल्यास सहाय्यासाठी कार्यालयाच्या ०२४८२-२९९०३३ या दूरध्वनीवर कार्यालयीन वेळेत संपर्क करावा किंवा jalnarojgargmail.com या ई-मेलवर संपर्क करावा.या मेळाव्याचा जास्तीत जास्त उमेदवारांनी उपस्थित राहुन लाभ घ्यावा. असे आवाहन कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाव्दारे केले आहे.

# जवाहर नवोदय विद्यालयात ऑनलाईन अर्ज भरण्यास मुदतवाढ

**जालना -** जवाहर नवोदय विद्यालय अंबा-परतूर लॅटरल एन्ट्री निवड चाचणी वर्ग ९ वी आणि वर्ग ११ वी करिता जालना जिल्ह्यातील इयत्ता ८ वी आणि १० वी वर्गात शैक्षणिक वर्ष सन २०२५-२६ मध्ये शिकत असणाऱ्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या पालकांसह सेवाकेंद्रावरून व इतर यंत्रणेचा वापर करून ऑनलाईन अर्ज भरण्याची शेवटची तारीख २३ सप्टेंबर २०२५अशी होती. प्रशासकीय कारणास्तव ही मुदत वाढवून दिनांक ७ ऑक्टोबर २०२५ पर्यंत करण्यात आलेली आहे. तरी इच्छुक विद्यार्थी,पालक,शिक्षक व मुख्याध्यापकांनी ह्याची नोंद घ्यावी.ऑनलाईन फॉर्म भरण्यासाठी फोटो, स्वाक्षऱ्या हे १० ते १०० KB मध्ये स्कॅन करून वर्ग नववी साठी https://cbseitms.nic/2025/nvsix 9 या संकेतस्थळावरून व अकरावी साठी https://cbseitms.nic/2025/nvsxi 11 या संकेतस्थळावरून भरावेत.जिल्हाभरातील सर्व मुख्याध्यापकांनी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांचे अर्ज भरण्याचे आवाहन जवाहर नवोदय विद्यालयाचे प्राचार्य एस.जी.पवार यांनी प्रसिध्दीपत्रकाव्दारे केले आहे.